Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | गुरुवार

२५.०६.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १४५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### ५२ वर्षांनंतर हैतीचा विश्वचषकात गोल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अटलांटा** - १९७४ नंतर तब्बल ५२ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर विश्वचषकात पुनरागमन करणाऱ्या हैती संघाने बुधवारी मोरोक्कोविरुद्धच्या सामन्यात पराभूत होऊनही चाहत्यांची मने जिंकली.

मोरोक्कोने हा सामना ४-२ ने जिंकून बाद फेरीतील आपले स्थान निश्चित केले असले, तरी हैतीने सामन्यात दोनदा आघाडी घेऊन फुटबॉल जगताला चकित केले. सामन्याच्या १० व्या मिनिटाला लेनी जोसेफच्या अप्रतिम प्रयत्नामुळे हैतीला पहिली आघाडी मिळाली. त्याने बॅक-हीलने चेंडू जाळ्यात धाडण्याचा केलेला प्रयत्न प्रेक्षकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

## महाराष्ट्र दमदार सुरुवात

# पावसामुळे शेतकरी राजा सुखावला, पेरणीला सुरुवात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर मान्सूनने मराठवाड्यासह छत्रपती संभाजीनगर, सोयगाव, सिल्लोड, गंगापूर, खुलताबाद भागात दमदार हजेरी लावत नागरिकांना दिलासा दिला आहे.

मंगळवारी सायंकाळनंतर अचानक वातावरणात बदल होऊन काळे ढग दाटून आले आणि काही वेळातच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या पावसामुळे शहरातील अनेक रस्ते पाण्याखाली गेले.

आज सकाळी दुसऱ्या दिवशीही पावसाने चांगलीच हजेरी लावली. यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



शेतकरी राजा सुखावला आहे तर काही ठिकाणी शेतकऱ्यांनी पेरणीलाही सुरुवात केली आहे.

हवामान विभागाच्या प्राथमिक आकडेवारीनुसार रात्री ११.३० वाजेपर्यंत २३.४ मिमी पावसाची नोंद करण्यात आली. आज दिवसभर शहरात कमाल तापमान ३५.६ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २५ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले. हवेत आर्द्रतेचे प्रमाण ७७ टक्के असल्याने दिवसभर प्रचंड दमदार सुरुवात केली. गेल्या तीन आठवड्यांपासून शहर आणि जिल्ह्यात समाधानकारक पावसाची प्रतीक्षा होती. शेतकरी वर्ग चिंतेत होता. अनेक भागांत पेरणी रखडली आहे.

शेतीसाठी आवश्यक असलेली ओल जमिनीत नसल्याने शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले होते. अशा परिस्थितीत झालेल्या या पावसामुळे खरीप हंगामाला बळ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शेतशिवारात पेरणीची लगबग सिल्लोड शहरासह तालुक्यातील अनेक भागांमध्ये मंगळवारी सायंकाळी पावसाला सुरवात झाली.

त्यामुळे अखेर पुढील काही दिवस शेतशिवारात पेरणीची लगबग पाहायला मिळणार आहे. जून महिना सरत आल्याने पावसाची ओढ सर्वांना लागली होती. खरिपाच्या पेरण्यादेखील खोळंबल्या होत्या.

मृग नक्षत्र पूर्ण कोरडे गेल्यामुळे यावेळी मृगाची पेरणी अपवाद वगळता झालीच नाही. तालुक्यात लागवड झालेली पूर्व हंगामी मिरची उन्हाच्या तडाख्यात सापडल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. मात्र, आता पेरणीचा लगबग सुरू झाली आहे.

# मराठी भाषेसाठी विकास केंद्रे उभारणार

## मंत्री उदय सामंत यांची घोषणा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यात मराठी भाषेचा प्रसार, संवर्धन आणि शासकीय कामकाजात मराठीचा अधिकाधिक वापर वाढविण्यासाठी राज्य सरकार विविध महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवत असून पुढील वर्षभरात राज्यातील आठ शहरांमध्ये अत्याधुनिक मराठी विकास केंद्रे उभारली जाणार आहेत, अशी घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी विधानसभेत केली.

भाजपच्या सुधीर मुनगंटीवार यांनी बुधवारी विधानसभेत राज्यातील शासकीय कामकाज मराठी भाषेत करण्याबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना सामंत यांनी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यातील पुणे, नाशिक, रत्नागिरी, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, चंद्रपूर आणि कोल्हापूर येथे सुसज्ज मराठी भाषा विकास केंद्रे उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले.

राज्य सरकार मराठी भाषेच्या जागतिक प्रसारासाठी स्वतंत्र उपक्रम राबवत असल्याचे सांगितले. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर केंद्र सरकारकडे पाठविलेल्या प्रस्तावाला पुढील दोन महिन्यांत मंजुरी मिळण्याची अपेक्षा आहे. लंडनमधील महाराष्ट्र मंडळाच्या ऐतिहासिक इमारतीची मालकी महाराष्ट्र सरकारने घेतली असून त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने ‘मराठी भाषा वैश्विक केंद्र’ सुरू करण्यात येणार आहे. जगभरातील मराठी भाषिकांसाठी हे केंद्र महत्वाचा दुवा ठरणार आहे, असा विश्वासही सामंत यांनी यावेळी व्यक्त केला.

मराठी भाषेच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध समित्या पुढील तीन महिन्यांत स्थापन करण्यात येतील. यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने अनुवाद समिती स्थापन करण्यात आली असून विविध भारतीय भाषांतील उत्कृष्ट साहित्य मराठीत आणण्याबरोबरच आर्थिकदृष्ट्या दुर्बल साहित्यिकांना मदत करण्याची जबाबदारी ही समिती पार पाडणार आहे, असेही ते म्हणाले आहे.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून बच्चू कडूंचा सरकारला घरचा आहेर : ‘जाचक अटींमुळे सरकारची प्रतिमा मलीन होतेय...’

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी, प्रोत्साहन अनुदानाची मर्यादा, ओटीएस (वन टाईम सेटलमेंट) योजना आणि प्रलंबित लाभांच्या वितरणावरून शिवसेनेचे आमदार बच्चू कडू यांनी विधानपरिषदेत कर्जमाफीतील त्रुटीवरून जोरदार टीका केली.

कर्जमाफीच्या अंमलबजावणीत असलेल्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेमुळे आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांमुळे सरकारची प्रतिमा खराब होत असून जनतेचा रोष वाढत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच कर्जमाफीसाठी आणि प्रोत्साहन अनुदानासाठी लावलेल्या अटी तातडीने रद्द केल्या पाहिजेत. ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहन रकमेऐवजी एक लाख रुपये देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही कडू यांनी केली.

शेतकऱ्यांची नावे कर्जमाफी यादीत आली, पण प्रत्यक्षात... नियम २६० अन्वये कर्जमाफीच्या अनुषंगाने विधानपरिषदेत उपस्थित चर्चेत बोलताना कडू यांनी ओटीएस योजनेबाबत संभ्रम असल्याचे सांगत त्यांनी सरकारकडे स्पष्ट भूमिका मांडण्याची मागणी केली. अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उदाहरणाचा उल्लेख करत, व्याजमाफीसारखे निर्णय राज्यभरातील सहकारी बँकांनी घेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कडू यांनी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांचे प्रलंबित लाभ अद्याप वितरित न झाल्याचा मुद्दाही उपस्थित केला. काही शेतकऱ्यांना न्यायालयात जावे लागले आहे. सरकारने याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी त्यांनी केली. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीमुळे सरकारची बदनामी होत असल्याचा आरोप करत त्यांनी कर्जमाफी प्रक्रियेत अधिक सुलभता आणण्याची गरज व्यक्त केली. तर काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी ॲग्रीस्टॅकमध्ये शेतकऱ्यांची सर्व माहिती उपलब्ध असताना पुन्हा केवायसीची सक्ती का केली जाते, असा सवाल उपस्थित केला.






### डवरगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगा प्रात्यक्षिक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** - आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डवरगाव येथे योगाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

शिक्षिका वर्षा चव्हाण यांनी उपस्थितांना योगाचे जीवनातील महत्त्व उपस्थितांना पटवुन दिले. त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करुन दाखविले व सर्व उपस्थितांकडून करून घेतले. कार्यक्रमाला सरपंचा लतिका बोडनासे, उपसरपंचा इंदिरा कठाने, अंगणवाडी सेविका उषा गावंडे, मदतनीस किरण कठाने, आशा सेविका बोडनासे तसेच शाळेतील मुख्याध्यापक प्रमोद मुन्हेकर, ग्रामपंचायत कर्मचारी उमेश गणवीर व सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन वर्षा चव्हाण तर उपस्थितांचे आभार शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद मुन्हेकर यांनी मानले.

# अवतरला आहे सर्वात शक्तिशाली सुपरकॉम्प्युटर! चीन अव्वल स्थानी, अमेरिकेला टाकले मागे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**बीजिंग** - सुपर कंप्युटिंगच्या जगात एक मोठा उलटफेर झाला असून चीनने अमेरिकेला मागे टाकून पुन्हा एकदा अव्वल स्थान पटकावले आहे. शास्त्रज्ञांच्या एका गटाने चीनच्या शेनझेन क्लाउड कम्प्युटिंग सेंटरमध्ये विकसित केलेल्या 'लाइनशाइन' या सिस्टिमला जगातील सर्वात वेगवान आणि शक्तिशाली सुपरकम्प्युटर म्हणून घोषित केले आहे. या कम्प्युटरचे फीचर्स म्हणजे यात पारंपरिक जीपीयू चिप्सचा वापर करण्यात आलेला नाही. सुपर कॉम्प्युटरचा वेग मोजण्याच्या चाचणीत चीनचा लाइनशाईन संपूर्ण जगात सर्वात वेगवान असल्याचे सिद्ध झाले. असे करून चीनने आता २०१७ नंतर शक्तिशाली कॉम्प्युटिंगचा किताब जिंकला आहे. सिस्टम केवळ वेगापेक्षा वेगवान नाही, तर सिस्टमही विशेष आहे कारण ती केवळ मानक मायक्रोप्रोसेसर वापरते आणि ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिटसारख्या विशेष चिप्स वापरत नाही ज्यावर बहुतेक उच्च-अंत सुपर कॉम्प्युटर भारी गणनेसाठी अवलंबून असतात. एका रिपोर्टनुसार जगातील सर्वात शक्तिशाली सुपर कॉम्प्युटरच्या 'टॉप ५००' यादीमध्ये स्थान मिळवणारे जॅक डोंगरा म्हणतात की, हे नवीन संगणक डिझाइन खूप उपयुक्त आहे.

### वाहनात राहलेली पर्स व त्यातील साहित्य

# प्रामाणिक टॅक्सी चालकाने केली परत : होताहेत कौतूक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**हिवरखेड** - आजच्या काळात प्रामाणिकपणा आणि माणुसकी दुर्मिळ होत चालल्याची चर्चा होत असताना हिवरखेड येथे घडलेल्या एका घटनेने या मुल्यांचा सुंदर प्रत्यय दिला आहे.

येथील मिस्त्री काम करणारे हिरामण डबरासे यांना अचानक अर्धांगवायूचा झटका आल्याने उपचारासाठी सुलतानपूर येथे दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर २४ जून रोजी पहाटे ३.४० वाजता अमरावती येथे आणण्यात आले. मात्र त्यावेळी अमरावतीहून हिवरखेड येथे जाण्यासाठी कोणतीही प्रवासी वाहतुक अथवा अन्य सोय उपलब्ध नव्हती. रुग्णाची प्रकृती लक्षात घेता त्यांना तातडीने घरी पोहोचविणे गरजेचे होते. अशा परिस्थितीत मानवतेच्या भावनेतून 'आपली मातृभूमी' वृत्तपत्राच्या वाहनाचे चालक मोहम्मद इलियास हाजी अब्दुल अजीज (अमरावती) यांनी डबरासे यांना त्यांच्या वाहनातून हिवरखेड येथे त्यांच्या घरी सुरक्षित पोहचविले. मात्र घाईगडबडीत डबरासे यांच्या पत्नीची पर्स वाहनातच राहून गेली. त्या पर्समध्ये मोबाईल फोन, काही रोख रक्कम तसेच महत्त्वाची कागदपत्रे होती. वाहन वरुडजवळ पोहोचल्यानंतर चालक मोहम्मद इलियास यांच्या निदर्शनास ही पर्स आली. त्यांनी तत्काळ हिवरखेड येथील पत्रकार जितेंद्र फुटाणे यांच्याशी संपर्क साधुन याबाबत माहिती दिली. फुटाणे यांनी चालकाला पर्स परत हिवरखेड येथे आणण्याची विनंती केली. त्यानंतर पर्स सुरक्षितपणे हिवरखेड येथे आणण्यात आली. पत्रकार जितेंद्र फुटाणे यांनी स्वतः डबरासे यांच्या घरी जाऊन पर्स त्यांच्या कुटुंबियांच्या स्वाधीन केली. हरवलेली पर्स परत मिळाल्यानंतर डबरासे यांच्या पत्नीच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. मोबाईल, रोख रक्कम व सर्व महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित मिळाल्याने त्यांनी चालक मोहम्मद इलियास आणि पत्रकार जितेंद्र फुटाणे यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# ग्रामपंचायत प्रभाग आरक्षणावर इत्तमगाववासियांचा आक्षेप

### अनंत वानखडे यांचे नेतृत्वात तहसिलदारांना निवेदन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** - तालुक्यातील इत्तमगाव (शहीद) येथे आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नुकत्याच काढण्यात आलेल्या प्रभाग आरक्षणावर गावकऱ्यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. यासंदर्भात इत्तमगाव येथील संतप्त मतदारांनी थेट वरुडचे तहसीलदार यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे एक लेखी निवेदन सादर केले. सदर आरक्षण प्रक्रियेत ओबीसी प्रवर्गावर मोठा अन्याय झाल्याचा आरोप या निवेदनातून करण्यात आला आहे.

तहसीलदार रामदास शेळके यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमुद केले आहे की, इत्तमगाव (शहीद) ग्रामपंचायत मध्ये एकूण ३ प्रभाग असून, २०११ च्या जनगणनेच्या आधारे ११ जून २०२६ रोजी तहसील कार्यालयात आरक्षण सोडत काढण्यात आली होती. या सोडतीमध्ये प्रभाग क्र.१ मध्ये अनुसुचित जाती आणि अनुसूचित जमाती महिला या प्रवर्गासाठी जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत.


परंतु, गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्रभाग क्र. १ मध्ये तब्बल ९०% ते ९५% लोकसंख्या ही ओबीसी प्रवर्गाची आहे. ज्या प्रवर्गाची तिथे लोकसंख्याच नगण्य आहे, त्या प्रवर्गासाठी जागा आरक्षित केल्यामुळे स्थानिक ओबीसी उमेदवारांवर आणि मतदारांवर मोठा अन्याय झाला आहे, अशी भावना निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. प्रशासनाने सन २००६ नंतरची पहिली सार्वत्रिक निवडणूक २०१५ आणि दुसरी निवडणूक २०२०-२१ विचारात घेऊन परिशिष्ट ४ मधील परिच्छेद क्र. ३.४ च्या नियमांनुसार हा कार्यक्रम राबविल्याचे म्हटले असले, तरी प्रत्यक्षातील लोकसंख्येचा ताळमेळ यात बसत नसल्याचा दावा गावकऱ्यांनी केला आहे.

त्यामुळे हे चुकीचे आरक्षण तात्काळ रद्द करण्यात यावे आणि लोकसंख्येच्या योग्य प्रमाणानुसार नव्याने आरक्षण काढून न्याय देण्यात यावा, अशी मागणी अनंत वानखडे, संदिप वानखडे, प्रतिक वानखडे, संजय वानखडे, गजानन मानिकपुरे, बाळासाहेब कोंडे, दिनेश कोंडे यासह गावातील नागरिकांनी केली आहे. आता या आक्षेपावर तहसील प्रशासन काय निर्णय घेणार? याकडे संपूर्ण वरुड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा दूरदर्शी, राष्ट्रभक्त डॉ.केशव हेडगेवारांनी पाया रचला..'

# आयपीएस विश्वास नांगरे पाटलांकडून कौतुकाचा वर्षाव, संविधानाची आणि खाकी वर्दीची शपथ विसरले, काँग्रेसचा हल्लाबोल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** - आयपीएस अधिकारी आणि नुकतीच नागपूर पोलिस आयुक्त म्हणून बदली झालेल्या विश्वास नांगरे पाटील यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्तुती केली. यानंतर सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर काँग्रेसने जोरदार हल्लाबोल केला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सुद्धा नांगरे पाटील यांच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमातील सहभागावरून जोरदार तोफ डागली आहे. त्यांनी म्हटलं आहे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रचारासाठी संख्या कमी पडत असेल म्हणून आता आयपीएस अधिकाऱ्यांना सोबत घेतलं आहे. विश्वास नांगरे पाटील यांनी प्रचार करावा म्हणूनच त्यांना संघ मुख्यालयात पाठवलं आहे, असा खोचक टोला विजय वडेट्टीवार यांनी लगावला आहे.

लोकशाहीचा आणि संविधानाचा अपमान दुसरीकडे, विश्वास नांगरे पाटील यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कौतुक करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियामध्ये व्हायरल झाल्यानंतर महाराष्ट्र काँग्रेसकडून तोच व्हिडिओ आता ट्विट करण्यात आला आहे. या ट्विटवरून नांगरे पाटील यांच्यावर कडाडून प्रहार केला आहे. शासकीय सेवेत असताना अशाप्रकारे एका विशिष्ट विचारसरणीची आणि द्वेष पसरवणाऱ्या संघटनेची चाटूगिरी करणे म्हणजे लोकशाहीचा आणि संविधानाचा अपमान आहे असा हल्लाबोल केला आहे. संविधानाची आणि खाकी वर्दीची शपथ विसरले, राग दरबारी गाण्या संघाच्या दारी हजर झाले, असा टोला सुद्धा काँग्रेसकडून लगावण्यात आला आहे. पोस्टमध्ये म्हटले आहे की, संविधानाची आणि खाकी वर्दीची शपथ विसरले, राग दरबारी गाण्या संघाच्या दारी हजर झाले! एका बाजूला भारतीय संविधानाची शपथ घेऊन, जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी अंगावर घेणार आणि दुसऱ्या बाजूला दिवसाढवळ्या समाजात द्वेष पसरवणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची जाहीर स्तुती करणार...हे कसले कर्तव्यदक्ष आयपीएस अधिकारी?

# दिल्ली प्ले स्कूल वरुड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** - दिल्ली प्ले स्कूल वरुड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन कोरिओग्राफर पियुष चांडक, रेणु वानखडे आणि जयश्री सातंगे यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमामध्ये उपस्थित सर्व शिक्षकांनी योगासने व प्राणायाम करुन योगाचे महत्त्व अधोरेखित केले. योग प्रदर्शनाचे मार्गदर्शन व सादरीकरण तेजल वैष्णव यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन अंजली कुरवाडे यांनी केले. यावेळी योगामुळे शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास होण्यास मदत होते, असे मान्यवरांनी सांगितले. प्राचार्या वृशाली काळबांडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपप्राचार्य अपूर्वा इखे, सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

### कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरामध्ये

# विविध ग्रुपने एकत्रित येत साजरा केला आंतरराष्ट्रीय योगा दिवस

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**वरुड** - येथे अनेक ग्रुप एकत्र येऊन कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरामध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी योगशिक्षक अशोक घोरमाडे, आयुर्वेदाचार्य डॉ.चरण सोनारे, योग शिक्षिका डॉ.मीना बंदे यांनी सर्व उपस्थित योग साधकांना योग व प्राणायाम पासून मानवी जीवनात होणारे फायदे व चांगल्या आरोग्यासाठी योग व प्राणायाम लाभदायक असून योग व प्राणायमाचे प्रात्यक्षिक सर्वांना करुन दाखविले व सुरु असलेल्या योगा क्लासला जाऊन नियमित योगा करावा, योगा क्लासला जाणे शक्य नसल्यास आपल्या घरी नियमित करावा, असे सांगितले.

या योग दिन निमित्ताने कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ.विजय देशमुख, डॉ.राम गोधने, डॉ,शैलेश लोखंडे, कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र पावडे, संचालक राजेश गांधी, हिराकांत उईके, मुकेश देशमुख, योग ग्रुपचे उद्धव फुटाणे, सतीश देशमुख व सर्व ग्रुप चे पदाधिकारी उपस्थित होते.

या योग दिनात योगेश्वर योगा साधना ग्रुप, आयएमए ग्रुप, निमा ग्रुप, निमा आयुर्वेदिक ग्रुप, इंडियन डेंटल असोसिएशन, होमियोपॅथी असोसिएशन, ड्रगिस्ट अँड केमिस्ट ग्रुपच्या डॉ.बंदे, योग ग्रुप, सीएस झम्मा ग्रुप, हरिसेवा फाऊंडेशन, ऑरेंजसिटी नर्सिंग कॉलेज, आयुष विभाग ग्रामीण रुग्णालय, कृषी उत्पन्न बाजार समिती, श्री साई योग ग्रुप यांनी सहभाग नोंदविला होता व या सर्व ग्रुप चे सर्व पदाधिकारी हजर होते.

कार्यक्रमाचे यशस्वितेकरिता डॉ.चरण सोनारे, महेंद्र राऊत, रामचंद्र राऊत, संदीप धोटे, पंकज अनासाने, राजेश चांडक, नितीन अगडकर, सुरेश सालोडे, सुनील काळे, प्रमोद देऊळकर यांचेसह सर्व योग साधक यांनी अथक परिश्रम केले. कार्यक्रमाचे संचालन प्रमोद देऊळकर यांनी केले.

# संपादकीय

**जो प्रयत्न करतो, तो कधीही अपयशी ठरत नाही.**

## नसरापूर अत्याचार प्रकरण : कठोर शिक्षेसोबत समाजमनाचाही जागर

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे अल्पवयीन चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. या प्रकरणातील आरोपीला २९ जून रोजी शिक्षा सुनावली जाणार असून, न्यायालयाच्या या निर्णयाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. अवघ्या काही वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर तब्बल ३९ मिनिटे क्रूर अत्याचार करण्यात आला. तिच्या अंगावर १८ जखमांच्या खुणा आढळल्या. या सर्व प्रकारानंतरही आरोपीच्या चेहऱ्यावर पश्चात्तापाची साधी छटा देखील दिसून आली नाही, ही बाब अधिक अस्वस्थ करणारी आहे. ही घटना केवळ एका मुलीवरील अत्याचार नसून, ती संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेला आणि मूल्यव्यवस्थेलाच विचार करायला भाग पाडणारी आहे. स्त्रिया आणि बालकांवरील अत्याचाराच्या घटना सातत्याने वाढत असल्याचे चित्र देशभर दिसून येत आहे. कठोर कायदे, जलदगती न्यायालये, मृत्युदंडाची तरतूद आणि जनजागृतीच्या विविध मोहिमा राबवूनही अशा घटना थांबताना दिसत नाहीत. यामागील मूळ कारण केवळ कायद्याची भीती नसणे इतकेच नाही, तर समाजातील काही घटकांच्या मानसिकतेत निर्माण झालेली विकृती हे आहे. महिलांकडे आणि मुलीकडे एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून पाहण्याऐवजी वस्तू म्हणून पाहण्याची विकृत प्रवृत्ती आजही समाजात अस्तित्वात आहे. नसरापूर प्रकरणाने याच वास्तवाची पुन्हा एकदा जाणीव करून दिली आहे. या प्रकरणातील आरोपीने केलेल्या कृत्याची क्रूरता मन सुन्न करणारी आहे. एका निष्पाप चिमुरडीवर एवढ्या निर्दयपणे अत्याचार करूनही त्याच्या मनात पश्चात्तापाची भावना नसणे हे समाजासाठी अत्यंत धोकादायक संकेत आहेत. गुन्हा केल्यानंतर अपराधीपणाची जाणीव न होणे ही मानवी संवेदनांच्या ऱ्हासाची गंभीर पातळी दर्शवते. त्यामुळे अशा आरोपींना केवळ शिक्षा देणे पुरेसे नाही, तर समाजात अशा विकृत प्रवृत्ती निर्माण होऊ नयेत यासाठी दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक आहेत. न्यायव्यवस्थेने या प्रकरणात तत्परता दाखवत खटल्याची सुनावणी जलदगतीने पूर्ण केली, ही समाधानाची बाब आहे. अनेकदा न्याय मिळण्यास होणारा विलंब पीडित आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी अधिक वेदनादायी ठरतो. त्यामुळे अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये जलद आणि प्रभावी न्याय ही काळाची गरज आहे. मात्र, न्याय म्हणजे केवळ आरोपीला शिक्षा नव्हे, तर पीडितेला आणि तिच्या कुटुंबाला मानसिक, सामाजिक आणि आर्थिक आधार देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अशा घटनांचा परिणाम पीडितेच्या संपूर्ण आयुष्यावर होत असतो. त्यामुळे तिच्या पुनर्वसनाची जबाबदारी समाज आणि शासन या दोघांनीही उचलली पाहिजे. कायद्यांची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्याचीही गरज आहे. शाळा, कुटुंब आणि समाज या स्तरांवर मुलांना लहानपणापासून स्त्री-पुरुष समानता, परस्पर सन्मान आणि संवेदनशीलतेचे शिक्षण देणे आवश्यक आहे. मुलांमध्ये योग्य मूल्ये रुजविणे ही केवळ शाळेची नव्हे, तर पालकांचीही जबाबदारी आहे. मोबाईल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे तरुणांच्या मानसिकतेवर परिणाम होत असल्याने त्याकडेही गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक वेळी एखादी धक्कादायक घटना घडते, समाजात संतापाची लाट उसळते, निषेध व्यक्त होतो आणि काही दिवसांनी सर्व काही पूर्ववत होते. मात्र, ही साखळी तोडण्यासाठी समाजाने सातत्याने जागरूक राहणे आवश्यक आहे.

# सत्याच्या शोधातील पोलिसांचा वेगवान तपास

**“ केतन अग्रवाल हत्या प्रकरण हे केवळ एका व्यक्तीच्या मृत्यूपुरते मर्यादित नसून, समाजाच्या न्यायव्यवस्थेवरील विश्वासाशीही संबंधित आहे. या प्रकरणातील प्रत्येक तथ्य समोर येणे, दोषींना कायद्यानुसार शिक्षा होणे आणि निष्पाप व्यक्तींवर अन्याय होऊ नये, हीच सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. तपास यंत्रणा सर्व उपलब्ध पुरावे, तांत्रिक माहिती आणि साक्षीदारांच्या मदतीने सत्याचा शोध घेत आहे. त्यामुळे तपास पूर्ण होईपर्यंत संयम बाळगणे आणि अधिकृत माहितीलाच महत्त्व देणे, हेच समाजहिताचे ठरेल.**

अलीकडच्या काळात राज्यभरात चर्चेचा विषय ठरलेल्या केतन अग्रवाल हत्या प्रकरणाच्या तपासाला आता अधिक गती मिळाल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणातील प्रत्येक पैलू उलगडण्यासाठी पोलीस यंत्रणा अत्यंत गांभीर्याने काम करत असून, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी स्वतः लोहगड किल्ल्यावर जाऊन घटनास्थळाची पाहणी केल्याने या तपासाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन तपासाचा आढावा घेणे, हे प्रकरणाची संवेदनशीलता आणि गंभीरता दर्शवणारे पाऊल मानले जात आहे.

केतन अग्रवाल यांच्या मृत्यूने अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. हा मृत्यू अपघाती होता की त्यामागे काही कटकारस्थान होते, याबाबत विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. मात्र, सत्य शोधण्याच्या दृष्टीने पोलीस यंत्रणा कोणतीही घाई न करता प्रत्येक पुराव्याचा बारकाईने अभ्यास करत आहे. घटनास्थळावरील परिस्थिती, उपलब्ध पुरावे, तांत्रिक माहिती, साक्षीदारांचे जबाब आणि अन्य तपशीलांच्या आधारे तपासाची दिशा निश्चित केली जात आहे.

**घटनास्थळाच्या पाहणीमुळे तपासाला नवी दिशा**

लोहगड किल्ला हा ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा परिसर आहे. अशा ठिकाणी घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण राज्याचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी तपास पथकाकडून सविस्तर माहिती घेतली आणि पुढील तपासाबाबत आवश्यक सूचना दिल्या.

वरिष्ठ अधिकाऱ्यांची घटनास्थळाला भेट ही केवळ औपचारिकता नसते, तर अनेकदा प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यानंतर तपासाला नवी दिशा मिळू शकते. घटनास्थळाची भौगोलिक रचना, संशयितांच्या हालचालींची शक्यता, घटनाक्रमातील विसंगती आणि उपलब्ध पुराव्यांची मांडणी यांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन तपास अधिक प्रभावी पद्धतीने करता येतो.

**तांत्रिक पुराव्यांना वाढते महत्त्व**

आधुनिक काळातील गुन्हे तपासामध्ये तांत्रिक पुरावे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मोबाईल लोकेशन, कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर), सीसीटीव्ही फुटेज, सोशल मीडिया संवाद, डिजिटल व्यवहार आणि फॉरेन्सिक तपास यासारख्या माध्यमांच्या सहाय्याने गुन्ह्याचा उलगडा करण्यात मोठी मदत होते. केतन अग्रवाल



प्रकरणातही पोलिसांकडून उपलब्ध तांत्रिक माहितीचे बारकाईने विश्लेषण केले जात आहे. संबंधित व्यक्तींच्या मोबाईलची तपासणी, त्यांचे संपर्क, घटनापूर्वी आणि घटनेनंतरच्या हालचाली यांचा मागोवा घेतला जात आहे. तपासातील प्रत्येक माहितीची शहानिशा करूनच पुढील पावले उचलली जात असल्याचे समजते.

**साक्षीदारांचे जबाब ठरू शकतात निर्णायक**

कोणत्याही गुन्हेगारी प्रकरणात साक्षीदारांचे जबाब हे अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. घटनास्थळाच्या आसपास उपस्थित असलेले नागरिक, पर्यटक, स्थानिक रहिवासी किंवा संबंधित व्यक्ती यांच्या जबाबांमधून अनेक महत्त्वाचे धागेदोरे मिळू शकतात. या प्रकरणातही पोलिसांकडून विविध व्यक्तींचे जबाब नोंदवले जात आहेत. काही वेळा एखादी लहानशी माहितीही तपासासाठी निर्णायक ठरू शकते. त्यामुळे साक्षीदारांनी कोणतीही माहिती लपवून न ठेवता तपास यंत्रणेला सहकार्य करणे आवश्यक आहे. यामुळे सत्य समोर येण्यास मदत होऊ शकते.

**अफवा आणि तर्कवितर्कांपासून दूर राहण्याची गरज**

सध्या या प्रकरणाबाबत सामाजिक माध्यमांवर विविध प्रकारच्या चर्चा आणि तर्कवितर्क सुरू आहेत. कोणताही अधिकृत निष्कर्ष समोर येण्यापूर्वीच अनेक दावे केले जात आहेत. मात्र, अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये अफवा पसरविणे किंवा अपूर्ण माहितीच्या आधारे निष्कर्ष काढणे हे तपासासाठी अडथळा निर्माण करू शकते.

तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरविणे किंवा कोणत्याही प्रकारची दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करणे टाळले पाहिजे. नागरिकांनी अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवणे आणि तपास यंत्रणेला सहकार्य करणे आवश्यक आहे.

**निष्पक्ष आणि सखोल तपासाची अपेक्षा**

केतन अग्रवाल हत्या प्रकरणामुळे समाजात अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. अशा परिस्थितीत तपास निष्पक्ष, पारदर्शक आणि सखोल पद्धतीने होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा पूर्वग्रह न ठेवता, उपलब्ध पुरावे आणि तथ्यांच्या आधारे सत्य समोर आणणे हीच तपास यंत्रणेची सर्वात मोठी जबाबदारी आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी स्वतः घटनास्थळी जाऊन तपासाचा आढावा घेतल्याने तपास यंत्रणा या प्रकरणाकडे अत्यंत गांभीर्याने पाहत असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे पीडित कुटुंबीयांना न्याय मिळण्याची आणि प्रकरणातील सत्य लवकरच समोर येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मन उधाण वाऱ्याचे

दुवेड्या मना गुंतताना कर विचार एकदा जागेपणी स्वप्न वेडी पडतील अनेकदा । वेदना कोवळी आली अलगद ओठावरी तू न जाणे की न जाणे मन उधाण वाऱ्यावरी श्वास घे रे ध्यास दे रे जगणे दे माझे मला हात हातात घेऊन घालते शपथ तुला । सजले धजले मन अंगीया आले उधाण हळुवार या वाऱ्याचे पायी बांधू रूणझुण । कोणीचं नाही कोणाचे तू तिथे अनब मी इथे आतुरलेल्या क्षणांना करून जाशी पालथे।

माझ्याचं कवितेच्या या ओळी वारंवार तरंग निर्माण करतात. अथांगच्या लाटेत मी पणा विरून जावा. सागराला साक्ष ठेवत बांधलेली नाती, स्वप्नांचे मनोरे, तुझ्यासोबतच्या आठवणीं सोनेरी वाळूत रित्या कराव्यात. शब्दांना मुक्त करून हृदयातली खळखळ ओरडून सांगावी. मनात जपलेली रूजुता दोघांच्या मनोभूमिकेला जोडणारं सुदृढ नातं वाऱ्याशी जोडून घ्यावं, त्याला आपलसं करत हितगुज करावं. प्रेमाचा सांगावा धाडावा आपल्या प्रिय व्यक्तीला. थोडं रूसून थोडं हसून वाद घालावे जन्मभराचे. मन उधाण वाऱ्याचे, गुज पावसाचे का होते बेभान कसे गहिवरते... मनाचा पहिला आणि शेवटचा पैलू म्हणजे गहिवरणं होय. खूप बोलायचं असून देखील बोलता येत नाही तेव्हा प्रकर्षाने जाणवणारा भाव म्हणजे गहिवरून येणं. पावसाची संततधार, खट्याळ वाऱ्यासह गहिवरलेल्या मनाची पाती निसर्गासंगे बोलू लागतात. चमत्कार अवनीचा पाहण्यास । मी जाय धरणी माझी माय।। ह्या हिरव्या पांदण वाटा। कसे ओढती माझे पाय।। बेधुंद वाहतो वारा। तनमन पुलकित सारे।।



वसुंधरेला खुणावती ही सताड उघडी दारे। समिंदराला उधाण येता हवे आणखी काय?।। ह्या हिरव्या पांदण वाटा ओढती माझे पाय। वाऱ्याच्या संगतीने डुलते ।। हिरवे हिरवे रान,। किलबिलणारी पाखरे बसली ।। फांदीवरती छान। दूरस्थ कोकिळ पानाआडून लयीत गाते माय।। ह्या हिरव्या पांदण वाटा। ओढती माझे पाय ।। सुंदर नयनरम्य निसर्गाच्या झुल्यावर हेलकावे खाऊ लागलेलं मन शरीरात नक्की कुठे असतं? आशिकीमुळे दिल की धडकन वाढते आणि रोमांचित तनू अवस्था होते. प्रेमात पडलेला प्रत्येकजण जेव्हा परस्पर आकर्षित होतो तेव्हा उधाणलेल्या बेधुंद वाऱ्यासारखी अवस्था होते. मन उधाण वाऱ्याच्या निर्मितीतला दुसरा प्रकार मजेशीर आणि शिकण्यासारखा आहे. आपल्याकडे महिन्यातील काही रविवार करमणुकीच्या कार्यक्रमाने सजलेले असतात. मागील काही वर्षांत लक्ष देता न आल्याने, उतारवयातील विरंगुळ्याचे साधन म्हणा किंवा, गतस्मृतींना उजाळा देण्यासाठी किंवा साधता न आलेल्या गोष्टींचा परिपाठ घडवून आणण्यासाठी विविध ठिकाणी ज्येष्ठालयं आणि वाचनालयासारखी दालन महिला पुरुष वर्गासाठी खुली आहेत. आमच्या शेजारच्या ज्येष्ठालयात असा एखादा कार्यक्रम रंगणार आहे याची सकाळपासून मला कुरबुर लागली होती. तेव्हा एक विचार डोक्यात आला, साठीपार केलेले वयस्कर तरुणाईला लाजवतील का? त्यांना वावरताना पाहिलं की किती भारी वाटेल? काय विशेष असेल आज? न राहवून माझे पाय ज्येष्ठालयाकडे वळले. आत प्रवेश करताचं सुखद अनुभवी गारवा जाणवला. त्या शोभिवंत, ऐटदार माणसांच्या चालीत संथपणा असला तरी मनाची उमेद कार्यक्रमास साजेशी होती. स्वागताला मनवेधक दारातली रांगोळी, सनईचे सूर, सुगंधी चाफ्याचा अत्तर शिडकावा. निमित्त होतं आजोबांच्या पंच्याहत्तरीचं आणि त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाचं. प्रकाशनाचा हा कौतुक सोहळा रंगणार हे जाणून मी स्थानापन्न झाले.

# ईडी कारवाई की राजकीय रणनीती? केरळमध्ये पुन्हा रंगले आरोप-प्रत्यारोप

केरळचे माजी मुख्यमंत्री पी. पिनराई विजयन यांची मुलगी वीणा विजयन ईडीच्या चौकशीत आहे. वीणा विजयन यांना कोचिंन मिनिरल्स अँड ऋतिल लिमिटेड (सीएमआरएल) प्रकरणात मनी लॉन्डरिंग (पीएमएलए) चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे. त्यांची आयटी कंपनी एक्सलॉजिक सोलुशन्सला सीएमआरएल कडून सुमारे दोन कोटीच्या संशयास्पद पेमेंट्सचा तपास सुरू आहे. १७ जून २०२६ रोजी कोचीतील ईडी कार्यालयात त्या हजर झाल्या आणि जवळपास १० तास चौकशी झाली. पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता. हे प्रकरण केरळ राजकारणात मोठी खळबळ उडवणारे आहे. ईडीचा दावा आहे की हे पेमेंट्स संशयास्पद व्यवहारांशी संबंधित आहेत. वीणा यांनी यापूर्वीही समन्स प्राप्त केले होते. केरळचे राजकारण, भाजपची राष्ट्रीय रणनीती, आणि गेल्या एक दशकात ईडीचा राजकीय हत्यार म्हणून कसा वापर झाला, हे आठवलं तर ईडीने दिली टाळी आता केरळची पाळी हेच घडेल असं वाटतंय.




२७ मे २०२६. पहाटेच्या अंधारात केरळच्या राजधानी तिरुवनंतपुरममध्ये अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) गाड्या एकाच वेळी अनेक दिशांनी निघाल्या. माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांचे निवासस्थान, त्यांच्या मुलीचे घर, जावयाचे निवासस्थान सगळीकडे एकाच वेळी धाडी. केरळच्या राजकीय इतिहासात असे कधी घडले नव्हते. काही वेळातच रस्त्यावर सीपीआय (एम) चे हजारो कार्यकर्ते उतरले, ईडीच्या गाड्यांवर दगडफेक झाली, काचा फुटल्या. अजय देवगण यांच्या 'रेड' सिनेमासारखे दृश्य चक्क प्रत्यक्षात केरळ मध्ये दिसत होतं. आपल्या नेत्याची निवडणुकीत पार विल्हेवाट लागलेली असताना आता हे ईडी काय भानगड हेच कार्यकर्त्यांना कळे ना! कार्यकर्त्यांनी गाडी फोडून, त्या ईडीच्या अधिकाऱ्यांची पळता भुई थोडी केली खरी पण या हिंसाचारापलीकडे पाहता एक प्रश्न मनात आला. हे केवळ एका भ्रष्टाचाराच्या तपासाचे छापे होते की भारतीय जनता पक्षाच्या केरळ जिंकण्याच्या दीर्घकालीन रणनीतीचा एक महत्त्वाचा टप्पा? कारण महाराष्ट्रापासून मध्यप्रदेश पर्यंत आणि गोव्या पासून आसाम पर्यंत असंच काहीसं घडत आलंय आणि वर्षे दोन वर्षात सत्ता पालट झालंय. प्रकरण काय आहे? प्रकरणाचा गाभा कुठे आहे? ईडीची कारवाई कोचिंन मिनिरल्स अँड ऋतिल लिमिटेड (सीएमआरएल) आणि एक्सलॉजिक सोलुशन्स या कंपन्यांशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात आहे. आरोप असा की सीएमआरएल या खनिज उत्खनन कंपनीने (ज्यात केरळ सरकारचाही १३.४% हिस्सा आहे) विजयन यांची मुलगी टी. वीणा हिच्या एक्सलॉजिक सोलुशन्स या आयटी कंपनीला २०१७ ते २०२१ दरम्यान सुमारे ?१.७ कोटी दिले. परंतु कोणतीही सेवा न घेता. म्हणजे हे ङ्गबनावट व्यवहारङ्ग होते, असा ईडीचा दावा आहे. एप्रिल २०२५ मध्ये सिरीयस फ्रॉड इन्वेस्टीगेशन ऑफिस (एसएफआयओ) ने वीणा विजयन आणि २६ जणांविरुद्ध कॉर्पोरेट फ्रॉड चार्जशीट दाखल केली.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह वरुड येथे

# ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु : लाभ घेण्याचे आवाहन

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड –** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या (समाज कल्याण) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह वरुड येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

आठवी ते पदवी पर्यंतचे विद्यार्थिनी प्रवेशासाठी पात्र आहेत. मागासवर्गीय प्रवर्ग निहाय आरक्षित टक्केवारी नुसार समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, जमाती, विशेष मागासप्रवर्ग, इतर मागासवर्गीय, अपंग, अनाथ, मांग(रुखी) इत्यादी प्रवर्गातील विद्यार्थिनी प्रवेशास पात्र असतील. विद्यार्थिनींना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता इ.दिला जातो. वसतिगृह प्रवेश प्रक्रिया विविध अटी व शर्थीच्या माध्यमातून ठरवुन दिलेल्या आरक्षित जागेसाठी प्रवर्गनिहाय मागासवर्गीय विद्यार्थिनींना प्रवेश दिला जातो. कुटुंबाचे उत्पन्न आणि विद्यार्थिनीच्या गुणवत्तेवर आधारित प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून व्यवस्थितरित्या पार पडण्याबाबत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अमरावती यांच्या द्वारे सर्व वस्तीगृहांना निर्देश प्राप्त झाले आहेत. आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन पद्धतीने अपलोड करून विद्यार्थिनींना आपले प्रवेश अर्ज हारीपशु.ारहरळीं.ीस वर ऑनलाइन पद्धतीने भरण्याचे आवहान गृहपाल पी.जी.इंगळे यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

# दोडक्या बहिणींकडून वसुलीची प्रक्रिया सुरू

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**मुंबई –** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याची कबुली स्वतः सरकारने विधानसभेत दिली आहे. या योजनेचा तब्बल १२ हजार ४१५ शासकीय कर्मचाऱ्यांनी लाभ घेतल्याचे लेखी उत्तरातून समोर आले



असून, या अपात्र लाभार्थ्यांना सुमारे १६५ कोटी रुपयांचा लाभ मिळाल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीबाबत विरोधकांकडून सातत्याने अनियमिततेचे आरोप केले जात होते. आता सरकारच्या लेखी उत्तरामुळे या आरोपांवर शिक्कामोर्तब झाल्याचे मानले जात आहे. लाडकी बहीण योजना ही आर्थिकदृष्ट्या गरजू महिलांसाठी सुरू करण्यात आली होती. मात्र, पडताळणीदरम्यान १२,४१५ शासकीय कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असल्याचे आढळून आले.

### स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे

# आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठया उत्साहात साजरा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड –** स्थानिक स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मानवाच्या आयुष्यात आरोग्याच्या दृष्टिकोनातून सामाजिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून एकंदरीत राष्ट्रीय स्वास्थ्याच्या दृष्टिकोनातून योगदिनाचे महत्त्व सांगण्यात आले. त्यानंतर सहायक शिक्षिका पुष्पा मोरे यांनी योगासन, प्राणायाम, सहज योगाचे प्रकार व त्याचे महत्त्व प्रत्यक्ष प्रात्यक्षिक द्वारे सर्वांकडून करुन घेतले आणि आपण योग दिवस हा प्रकार फक्त एका दिवसापूर्वी मर्यादित न ठेवता आपण जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत निरंतरपणे अखंडपणे सराव केला पाहिजे, असे सांगितले. मुख्याध्यापक विजय आडे यांनी मानवाच्या शारीरिक मानसिक स्वास्थ्यासाठी योगाची अत्यंत आवश्यकता आहे तसेच योगामुळे एकाग्रतात वाढते, असे सांगितले. यावेळी मुख्याध्यापक प्रदीप पाटील तसेच पर्यवेक्षिका माधुरी मेश्राम यांनी उपस्थिती दर्शविली. याप्रसंगी या सहज योगाबद्दल सहज योग ध्यानधारणा केंद्राचे संचालक मेश्राम यांनी सुद्धा सहज योगा याबद्दल प्रात्यक्षिके करून दाखवली. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार ज्येष्ठ शिक्षक प्रशांत वडे यांनी मानले. या निमित्त शाळेचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, एन एन सी महाराष्ट्र ८ बटालियनचे विद्यार्थी तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नगर परिषद कार्यालयात

# एकल महिला दिवस उत्साहात साजरा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**शेंदुरजनाघाट –** नगर परिषद कार्यालय शेंदूरजनाघाट येथे आंतराष्ट्रीय विधवा दिन 'एकल महिला दिवस' म्हणुन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला एकल महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष सुवर्णा वरखेडे तर प्रमुख अतिथी म्हणुन महिला व बालकल्याण समिती सभापती प्रिया पाटील उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणुन शिक्षण व आरोग्य सभापती निलिमा कुबडे उपाध्यक्षा सुनीता वंजारी, नगर सेविका संगीता अकर्ते, शितल होले, कार्यालय अधिक्षक विद्या धवणे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी विलास आठवले उपस्थित होते.

महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षानिमित्त नगराध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच पदाधिकाऱ्यांनी प्रतिमेचे पूजन व हारार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात केली. नगराध्यक्ष सुवर्णा वरखेडे यांनी अध्यक्षीय भाषणात एकल महिलांच्या प्रश्नांबाबत नगरपरिषद सदैव त्यांच्या पाठीशी उभी राहील, अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाला उपस्थित एकल महिलांनी विविध समस्या व सूचना मांडल्या. त्यांची नोंद घेऊन संबंधित प्रस्ताव जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मार्फत शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष यांनी दिली. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात एकल महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे संचालन शहर उपजीविका केंद्राच्या व्यवस्थापक मेघा महल्ले, प्रास्ताविक सहाय्यक प्रकल्प अधिकारी विलास आठवले तर आभार समुदाय संघटक उमेश माहोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी रणरागिणी शहर स्तर संघ अध्यक्षा मिना कपले, सचिव निता पोटे, सविता घोरपडे, किर्ती चौधरी, माला कंगाले, काजल शेंडे, कल्पना श्रीखंडे, मनिषा नांदुरकर, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी परिश्रम घेतले.

# सिया गोयलचे फक्त चेतनशी नव्हे तर इतर मुलांशी अश्लील चॅटिंग, अनैतिक संबंध? केतन अग्रवालच्या वडिलांचा गंभीर आरोप

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**पुणे –** सध्या राज्यासह देशात चर्चेचा विषय ठरलेल्या पुण्याच्या ऐतिहासिक लोहगड किल्ल्यावर व्यावसायिक केतन अग्रवाल याची दरीत ढकलून हत्या केल्याच संतापजनक प्रकरण घडलं.

या प्रकरणात आता अत्यंत नाट्यमय आणि महत्त्वाचं वळण मिळालं आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास करणाऱ्या पुणे ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेला या गुन्ह्यात धक्कादायक माहिती हाती लागली आहे. तपासादरम्यान सिया गोयल आणि हत्याकांडात सामील असलेला तिचा मित्र चेतन चौधरी यांचे कॉल रेकॉर्ड तपासण्यात आले आहे. मागच्या केवळ साडेपाच महिन्यात तब्बल २००४ फोन कॉल आणि २३८ तास गप्पा झाल्याच्या माहिती समोर आली आहे. दोघांमध्ये प्रेमसंबंध असल्याची शक्यता वर्तवली जात असतानाच आता केतनच्या कुटुंबीयांनी काही गंभीर आरोप केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सियाला हे लग्न करायचेच नव्हते. शिवाय तिचे चेतनसोबत संबंध होते. यासह तिचं इतर अनेक मुलांसोबत अश्लील संभाषण आणि संबंध असल्याचा आरोपही कुटुंबीयांनी केला आहे. जयपुरमध्ये १७ कोटींचं संपूर्ण हॉटेल बुक करून लग्नाची जोरदार तयारी, पण.. केतनला ट्रेकिंगची प्रचंड आवड होती, तो एक अनुभवी ट्रेकर होता.

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र. प्रस्तु-१/कावी-२९९/२५-२६ दि.११/०६/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्री चंद्रकांत गोपळराव गणोरकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **श्री आजोबा नामे रघुनाथ पांडुरंग गणोरकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा मृत्यू दि.१९/०६/१९८९** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदर्हू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **११/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील एम.डी.सैनदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५२०/२०२६ ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) विजय चंद्रभानजी धुर्वे, वय अं.४७ वर्ष, धंदा-शेती

२) राजु चंद्रभान धुर्वे, वय अं.४४ वर्ष, धंदा- शेती

अर्जदार क्र.१ व २ रा.सावंगा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत चंद्रभानजी तुकारामजी धुर्वे व चंद्रकला चंद्रभान धुर्वे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२३/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५१९/२०२६ ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) ममता सुनिलराव सरोदे, वय अं.४९ वर्ष, धंदा-घरकाम

२) वैशाली नरेश पुरी, वय अं.४४ वर्ष, धंदा- घरकाम

अर्जदार क्र.१ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

अर्जदार क्र.२ रा.समुद्रपुर, ता.समुद्रपुर, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत सिंधु दिवाकर टेंभे व दिवाकर राजाराम टेंभे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२३/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ वरुड येथील एम.डी.सैनदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५११/२०२६ ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) सुलोचना खुशाल पाटील, वय अं.४२ वर्ष, धंदा-घरकाम, २) मधुरा खुशाल पाटील, वय अं.११ वर्ष, धंदा-शिक्षण, ३) तनिष्क खुशाल पाटील, वय अं.०८ वर्ष, धंदा-शिक्षण, अर्जदार क्र. १ ते ३ रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत खुशाल कोठीराम पाटील, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२३/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# एकनाथ शिंदेंच्या 'ऑपरेशन टायगर' मोहीमेत मुख्यमंत्र्यांचा महत्वाचा रोल? गल्ली ते दिल्लीपर्यंत शिष्टाई? देवेंद्र फडणवीसांनी एका शब्दात विषय संपवलला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्याच्या राजकारणात खळबळ उडवणाऱ्या 'ऑपरेशन टायगर' यशस्वी झाल्यानंतर अनेक तर्क वितर्क, आरोप-प्रत्यारोपांनी राजकीय वातावरण तापलं आहे. किंबहुना एकवेळा नव्हे तर दोनवेळा ठाकरेंची शिवसेना फोडण्याची कामगिरी करुन ठाकरेंचा सेनाला जबर धक्का दिला आहे. अशातच महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात चर्चेच्या केंद्रस्थानी असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या 'ऑपरेशन टायगर'मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्त्वाची मदत मिळाल्याची माहिती आता समोर आली आहे. किंबहुना देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच 'ऑपरेशन टायगर' खऱ्या अर्थाने मार्गी लागल्याचे सांगितले जात आहे. या चर्चेबाबत आणि मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेविषयी त्यांना विचारले असते मुख्यमंत्र्यानी एका शब्दात प्रतिक्रिया देत पूर्णविराम दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला असता, त्यांनी थेट हात जोडत म्हणाले आहे.

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ वरुड येथील**
**एम.डी.सैनदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५१७/२०२६** **ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) साबेरा बी अब्दुल राऊफ, वय अं.५३ वर्ष, धंदा-घरकाम

२) जाहीद परवेज अब्दुल रऊफ मंसुरी, वय अं.२५ वर्ष, धंदा- शिक्षण

अर्जदार क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि. अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत अब्दुल रऊफ अब्दुल अजीज, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२३/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ वरुड येथील**
**एम.डी.सैनदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५१४/२०२६** **ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) भाष्कर महादेवराव बेलसरे, वय अं.६१ वर्ष, धंदा-शेती

२) सुवर्णा गजानन सेवतकर, वय अं.५८ वर्ष, धंदा- घरकाम

अर्जदार क्र.१ व २ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

ह.मु.रा.सोमलवाडा, नागपुर, ता.जि.नागपुर

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत महादेवराव नत्थुजी बेलसरे व पार्वतीबाई महादेवराव बेलसरे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२३/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ वरुड येथील**
**वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५१६/२०२६** **ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) सजंय दिगांबर टेंभे, वय अं.५४ वर्ष, धंदा-शेती

२) संदीप दिगंबर टेंभे, वय अं.५१ वर्ष, धंदा- शेती

३) तृप्ती आशिष दाभेरे, वय अं.४२ वर्ष, धंदा- घरकाम

अर्जदार क्र.१ व २ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

अर्जदार क्र.३ रा.पांग्रा, ता.सिंदखेड राजा, जि.बुलढाणा

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत दिगांबर बापूजी टेंभे व सुधाबाई दिगांबर टेंभे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२३/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४९४/२०२६** **ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-**

सखुबाई शामलाल बरधे

वय अं.८६ वर्ष, धंदा- घरकाम

रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रमेश शामलाल बरदे (बरधे), रा.वंडली, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# मिरा-भाईंदर जमीन खरेदी प्रकरणात भाजप आमदार नरेंद्र मेहतांवर ठपका : जिल्हाधिकाऱ्यांचा चौकशी अहवाल महसूल मंत्र्यांकडे सादर, बावनकुळे काय कारवाई करणार?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मिरा-भाईदर परिसरातील आदिवासी जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारात गंभीर गैरव्यवहार आणि अनियमितता झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी यासंबंधीचा चौकशी अहवाल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सादर केला असून, यामध्ये भाजपचे स्थानिक आमदार नरेंद्र मेहता आणि त्यांच्या कंपनीवर गंभीर ठपका ठेवण्यात आला आहे.

या अहवालामुळे राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे. ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने मौजे वरसावे येथील विविध गट क्रमांकांवरील जमिनींच्या व्यवहारांची सखोल कागदपत्रे तपासली.

या अधिकृत चौकशी अहवालात आदिवासी जमिनींचे बेकायदा हस्तांतरण, जमीन व्यवहारातील मोठी अनियमितता आणि महसूल अभिलेखांमधील (रेकॉर्ड) गंभीर त्रुटींवर थेट बोट ठेवण्यात आले आहे. तक्रारदारांच्या जमिनी आदिवासींकडून बिगर आदिवासी व्यक्ती आणि कंपन्यांकडे बेकायदेशीरपणे हस्तांतरित झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४९३/२०२६** **ने.ता.२३/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) विनोद रामदासजी वडस्कर, वय अं.५४ वर्ष, धंदा-नोकरी, २) प्रमोद रामदास वडस्कर, वय अं.५० वर्ष, धंदा- शेती, क्र.१ व २ रा.बेनोडा, ता.वरुड, ३) पद्मा रामदास राऊत, वय अं.६२ वर्ष, धंदा-घरकाम, रा.पुसला, ता.वरुड, ४) दुर्गा गजानन राऊत, वय अं.२९ वर्ष, धंदा-घरकाम, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती, ५) मनोज अशोक काकडे, वय अं.२७ वर्ष, धंदा-शेती, रा.टेंभूरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रामदास शामरावजी वडस्कर व मयत नर्मदा रामदासजी वडस्कर, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४९५/२०२६** **ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) किशोर वामनराव गोहाड, वय अं.५५ वर्ष, धंदा-नोकरी, रा.वरुड, ता.वरुड, २) शैलेश वामनराव गोहाड, वय अं.५२ वर्ष, धंदा- नोकरी, रा.वरुड, ता.वरुड, ह.मु.ठाणे, ता.जि.ठाणे, ३) कविता भुपेंद्र गोहाड, वय अं.४९ वर्ष, धंदा-घरकाम, ४) श्रेया भुपेंद्र गोहाड, वय अं.२७ वर्ष, धंदा-शिक्षण, ५) गौरी भुपेंद्र गोहाड, वय अं.२१ वर्ष, धंदा-शिक्षण, ६) शाश्वत भुपेंद्र गोहाड, वय अं.१३ वर्ष, धंदा-शिक्षण, क्र.३ ते ६ ह.मु.देवाशिष शहर, बोरखेडा, कोटा, ता.जि.कोटा (अर्जदार क्र.६ करीता अ.पा.क म्हणुन अर्जदार क्र. ३ आई)

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत वामनराव माधवरावजी गोहाड व मयत सुशिला वामनराव गोहाड, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४९२/२०२६** **ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती कुसूम गोविंदराव वाघाडे, वय अं.६० वर्ष, धंदा-गृहीणी, २) श्रीमती अर्चना गजेंद्र वाघाडे, वय अं.२७ वर्ष, धंदा- गृहीणी, ३) कु.जानवी गजेंद्र वाघाडे, वय अं.१२ वर्ष, धंदा- शिक्षण, ४) सोहम गजेंद्र वाघाडे, वय अं.९ वर्ष, धंदा- शिक्षण (अर्जदार क्र.२ ही स्वत:करीता व अ.पा.क.आई म्हणून अर्जदार क्र. ३ व ४ करीता) क्र.१ ते ४ रा.गोरेगांव, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत गजेंद्र गोविंदराव वाघाडे, रा.गोरेगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४९७/२०२६** **ने.ता.२९/०७/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती चंद्रकला पुंडलिक चोपडे, वय अं.६६ वर्ष,धंदा-घरकाम

२) विकास पुंडलिकराव चोपडे, वय अं.४८ वर्ष, धंदा- मजुरी

क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत पुंडलिक मारोतराव चोपडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# यंदाची आषाढी वारी जगभर पोहोचणार : डिस्कव्हरी आणि जिओग्राफी वाहिन्यांवरून थेट प्रक्षेपण

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या यंदाच्या आषाढी वारीचा सोहळा डिस्कव्हरी आणि जिओग्राफी या आंतरराष्ट्रीय दूरचित्रवाहिन्यांद्वारे जगभर पोहोचणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिली.

सरकारने वारीची सर्वंकष तयारी पूर्ण केली असून लाखो वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण प्रशासन युद्धपातळीवर काम करत आहे. वारीत कोणत्याही वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज विधानभवनात पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली. पालखी मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, राष्ट्रीय महामार्गावरील विकासकामे, मुक्कामस्थळी जर्मन हँगर, पाणी, स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षा यंत्रणा यांची सक्षम व्यवस्था करण्यात आली आहे.

सर्व प्रमुख पालख्यांच्या मुक्कामस्थळी प्रशस्त हँगर उभारण्यात आल्याने लाखो वारकऱ्यांना पावसाळ्यात सुरक्षित निवारा मिळणार असल्याचे फडणवीस म्हणाले. यावेळी पालखी सोहळा प्रमुखांच्या बहुतांश मागण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.

# तापाच्या रुग्णाला आरोग्य यंत्रणेकडे पाठवणाऱ्या पुजाऱ्याला मिळणार २०० रुपये भत्ता

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*



***गडचिरोली*** – जिल्ह्याच्या दुर्गम भागातील अनेक नागरिक तापाच्या उपचारासाठी अनेकदा पारंपरिक पुजाऱ्याकडे जातात.

त्यामुळे उपचारास विलंब होतो आणि अनेकदा जीवही जातो. ही बाब लक्षात घेऊन तापाचा रुग्ण तात्काळ शासकीय आरोग्य यंत्रणेकडे पाठविणाऱ्या पारंपरिक पुजाऱ्यांना प्रतिरुग्ण २०० रुपये प्रोत्साहन भत्ता देण्यात येणार आहे. रुग्णांमधील अंधश्रद्धेचा पडगा दूर करण्यासाठी गडचिरोली जिल्हा आरोग्य प्रशासनाने ही तरतूद केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मलेरिया व डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या आढावा बैठकीत यासंदर्भात चर्चा करण्यात आली. दरम्यान, जिल्ह्यात मलेरियाचा प्रकोप पाहता कोणत्याही व्यक्तीस ताप असल्यास त्याची मलेरिया संशयित म्हणून १०० टक्के रक्त तपासणी करावी, इतर कारण निश्चित होईपर्यंत तापाच्या प्रत्येक रुग्णाकडे मलेरिया रुग्ण म्हणून पाहून आवश्यक वैद्यकीय उपाययोजना कराव्यात, असे निर्देशही जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी दिले आहेत.

# लग्नपत्रिकेत वधूवरांची जन्म तारीख बंधनकारक करण्याचा विचार

## बालविवाह रोखण्यासाठीचा उपाय

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – राज्यातील बालविवाहाच्या प्रथेला आळा घालण्यासाठी राजस्थान सरकारप्रमाणे लग्नपत्रिकेत वधू-वराची जन्मतारीख नमूद करण्याचे बंधन घालण्याचे सूतोवाच महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी बुधवारी विधानसभेत केले.

त्याबाबतचा अभ्यास ग्रामविकास, विधी आणि न्याय तसेच संबंधित विभागांच्या समन्वयातून केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. बालविवाह पूर्णपणे रोखण्यासाठी सरकारने कृती आराखडा तयार केला असून, पुढील पाच वर्षांत राज्यातील बालविवाहाचे प्रमाण १० टक्क्यांच्या आत आणण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आल्याची माहितीही तटकरे यांनी दिली.

# चुका केल्या, पण कारणे तांत्रिक : नार्वेकरांचा खुलासा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – पद्मविभूषण आशा भोसले यांच्या निधनानंतर विधानसभेत शोकप्रस्तावाचे वाचन करताना झालेल्या शब्दोच्चारातील चुकांवरून राज्यभर टीकेची झोड उठल्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी सभागृहात दिलगिरी व्यक्त केली. मराठी भाषेबद्दल आपल्याला प्रचंड अभिमान असून, शोकप्रस्तावाच्या वाचनावेळी झालेल्या चुका या केवळ तांत्रिक कारणांमुळे झाल्याचा खुलासा त्यांनी केला.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सोमवारी आशा भोसले, पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांच्यासह विधानसभेच्या माजी दिवंगत सदस्यांना विधानसभेत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राहुल नार्वेकर यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहताना शोकप्रस्तावाच्या वाचनात असंख्य चुका केल्या. या चुकांबाबत नार्वेकर यांच्यावर समाज माध्यमातून टीका झाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही नार्वेकर यांना त्यांच्या मराठी वाचनावरून फटकारले होते.

# प्रथमच 'फायर इंजिन'चे स्टेअरिंग महिलेच्या हाती

## आत्मविश्वास असेल तर अशक्य ही शक्य : पल्लवी पाटील यांचा विश्वास

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – आग लागली, झाड कोसळले, इमारत कोसळली, झाडावर पक्षी अडकला तर पहिला फोन खणखणतो तो मुंबई अग्निशमन दलाला. दुर्घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेत बचावकार्य करणे हेच जवानांचे प्रथम कर्तव्य असते.

अशा आव्हानात्मक समजल्या जाणाऱ्या मुंबई अग्निशमन दलात प्रथमच 'फायर इंजिन'चे स्टेअरिंग महिलेच्या हाती आले आहे. पल्लवी पाटील या मुंबई अग्निशमन दलात पहिल्या 'फायर इंजिन'चालक ठरल्या आहेत.

'अग्निशमन दलात कार्यरत असताना आव्हानात्मक काम करण्याची इच्छाशक्ती, त्यामुळे 'फायर इंजिन' चालवण्याच्या सगळ्या परीक्षा उत्तीर्ण झाले आणि 'फायर इंजिन'ची कमांड हाती घेतली.

'फायर इंजिन'चे स्टेअरिंग हाती घेतल्यानंतर तीन कॉल अटेंड केले असून मुंबईच्या रस्त्यांवर गाडी चालवणे खरेच चॅलेंजिंग आहे. परंतु आत्मविश्वास असेल तर अशक्य ही शक्य आहे', असा विश्वास मुंबई अग्निशमन दलातील पहिल्या फायर इंजिनचालक ठरलेल्या पल्लवी पाटील यांनी व्यक्त केला. मुंबई अग्निशमन दलात पुरुषांबरोबर महिलाही मुंबईकरांसाठी जिवाची बाजी लावून काम करत आहेत. जिवाची

# विज पडून ईसमाचा दुर्दैवी मृत्यू

## तालुक्यातील वघाळ शेतशिवारातील घटना

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – बकऱ्या चारण्यास गेलेल्या गुराख्याचा विज पडून मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील वघाळ शेतशिवारामध्ये घडली.

प्राप्त माहीतीनुसार, मुळचे गाडेगाव येथील रहिवाशी असलेले राजु देवराव नेरकर हे काल (ता.२३) दुपारच्या सुमारास वघाळ शेतशिवारातील हेमंत देशपांडे यांचे शेतानजीक बकऱ्या चारण्याकरीता गेले होते. संध्याकाळ होवुन सुध्दा ते घरी परतले नाही. त्यामुळे कुटूंबिय आणि गावकऱ्यांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला, रात्रीच्या सुमारास राजु यांचा मृतदेह आढळुन आला. याबाबत पोलिसांना माहीती दिल्यानंतर बेनोडा (शहीद) पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह शवविच्छेदनाकरीता रवाना केला परंतु त्यांचे मृत्यूबाबत विविध चर्चांना पेव फुटल होते. बाजुला असलेल्या विद्युत संचाचा धक्का लागुन त्यांचा मृत्यू झाला असावा? अशी चर्चा सुरु होती परंतु तो संच कायमस्वरुपी बंद असल्यामुळे त्याचा धक्का लागु शकत नाही, असे विज वितरण कंपनीतर्फे कळविण्यात आल्यानंतर आज शवविच्छेदनादरम्यान विज पडून त्यांचा मृत्यू झाला असावा, असा कयास डॉक्टरांनी व्यक्त केला.

या प्रकरणी बेनोडा (शहीद) पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून प्राथमिक तपास ठाणेदार विवेक देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली पवन भोकरे करीत आहेत.

